Indexed Journal with
www.sjifactor.com
Impact Factor
7.264 (2021)

ISSN [illegible]

Volume - [illegible], Special Issue - 02, Oct. 15, 2021

*A Half Yearly Peer Reviewed Multidisciplinary Indexed*
*National Research Journal of Social Sciences & Humanities...*

National Journal on ...

# SOCIAL ISSUES AND PROBLEMS



'Special Issues on Current Challenges In front of Indian Society'

Gondia Education Society's

**SETH NARSINGDAS MOR ARTS, COMMERCE &**
**SMT. GODAVARI DEVI SARAF SCIENCE COLLEGE**

TUMSAR, DIST. BHANDARA - 441912.

**A Half Yearly Peer Reviewed Multidisciplinary Indexed National Research Journal of Social Sciences & Humanities.... 'Social Issues and Problems' ISSN 2278-3199 Impact Factor – 7.264**

## - CONTENTS -


| | | | |
|---|---|---|---|
| 26. | Consequences of Privatization on Govt. Companies | Amita Raghtate | ...76 |
| 27. | स्कुली बच्चोंपर कोविड–१९ का प्रभाव | शुभा नीखरा | ...78 |
| 28. | भारतीय समाजपर कोरोना का प्रभाव | अनिलकुमार गुप्ता | ...81 |
| 29. | ओबीसी आरक्षण धोरणाचे पुनर्विलोकन झाले पाहिजे | नारायण कांबळे/ व्ही. एल. येरंडे | ...83 |
| 30. | खाजगीकरणाचे शिक्षण व आरक्षणांवरील परिणाम | विद्या खंडारे–गोवंदे | ...88 |
| 31. | कोरोना टाळेबंदीचे सामाजिक दुष्परिणाम | विलास चव्हाण | ...91 |
| 32. | नवीन कृषी कायदे व शेतकरी आंदोलन | जगदीश ससाणे | ...94 |
| 33. | कोविड–१९ चा भारतीय समाजावरील परिणाम | लिना गादेवार | ...97 |
| 34. | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा उच्च शिक्षणावर प्रभाव | रंजना तिजारे | ...100 |
| 35. | कोविड–१९ विश्वव्यापी महामारीमुळे भारतीय समाजात उद्भवलेल्या समस्या | चंद्रशेखर भेजे | ...103 |
| 36. | भारतातील बेरोजगारीची समस्या | बबन सेलकर | ...106 |
| 37. | वर्तमान शिक्षणप्रणाली आणि बहुजन समाजाची अस्वस्थता | अशोक भक्ते | ...109 |
| 38. | बाढती बेरोजगारी: भारतासमोरील गंभीर आव्हान | ज्योती सेलुकर | ....112 |
| 39 | बाढती बेरोजगारी: प्रश्न आणि आव्हाने | बिरादर प्रतिभा | ...116 |
| 40 | वाढती बेरोजगारी: प्रश्न आणि आव्हाने व उपाय | राजेश बालोदे | ...119 |
| 41 | कोविड–१९ चा सामाजिक परिणाम | रविंद्र मोहतुरे | ...122 |
| 42 | भारतातील शेतकरी चळवळीच्या वर्तमान स्थितीचा चिकित्सक अभ्यास | सुहास नांद्रे | ...125 |
| 43 | भारतातील आदिवासी समाजासमोरील प्रश्न आणि आव्हाने | भिमराव उबाळे | ...128 |
| 44 | अफगाणिस्तानातील वर्तमान राजकीय परिस्थिती आणि भारत | कुणाल राठोड | ...131 |
| 45 | समाज माध्यमांतील फॉरवर्ड होणारे संदेश व त्यांचा समाजावरील परिणाम | मोहिनी कनकदंडे | ...134 |
| 46 | कोविड–१९ व टाळेबंदीमुळे भारतीय समाजासमोर निर्माण झालेली नवी आव्हाने | हेमंत देशमुख | ...137 |
| 47 | कोविड–१९ महामारीचा भारतीय समाजावरील परिणाम | वसंत निनावे | ...140 |
| 48 | जागतिकीकरण: कृषी क्षेत्राची दुरावस्था: नवीन कृषी कायदे | प्रदीप भानसे | ...143 |
| 49 | मराठा व ओबीसी आरक्षण | प्रदीप गजभिये | ...146 |
| 50 | कोविड–१९ चा भारताच्या सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेवर परिणाम | प्रमोद शेंडे | ...148 |
| 51 | भारतातील वाढती बेरोजगारी: प्रश्न आणि आव्हाने | प्रतिक ठाकरे | ...151 |

Volume – 10, Special Issue – 02, Oct. 15, 2021/ ISSN 2278-3199/ Impact Factor – 7.264

# भारतातील आदिवासी समाजा समोरील प्रश्न आणि आव्हाणे

**डॉ. भिमराव प्रल्हाद ठवाळे**, समाजशास्त्र विभाग, संत भगवान बाबा कला महाविद्यालय, सिंदखेडराजा जि. बुलढाणा. मो.९९२१८३२११४

**प्रस्तावना :** भारत देश जसा विविधतेने नटलेला आहे तसाच भारतीय समाज देखिल विविध जातीमध्ये विभागला गेला आहे. भारतात ६००० (सहा हजार) पेक्षा जास्त जाती आणि उपजाती आहेत. या जाती प्रमाणेच विविध आदिवासी जमाती सुध्दा आहेत. देशातील जवळ जवळ सर्वच राज्यात आदिवासी जमाती आढळतात. भारतात २५० आदिवासी जमाती आहेत. आदिवासी जमाती आणि उपजमातींचा विचार केल्यास त्यांची संख्या ४५० च्या जवळपास असलेली दिसून येते. भारतीय संविधानातील कलम ३४१ आणि कलम ३४२ नुसार अनुसुचित जनजातीची नोंद करण्यात आली आहे. आदिवासी जमाती भारतातील सर्वच राज्यातील डोंगरदऱ्यात राहत आहेत. त्यांच्यात वांशिक, भाषिक, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टया भिन्नता असलेली दिसून येते. भारतात सर्वात जास्त आदिवासी लोक झारखंड आणि छत्तीसगड या राज्यात आहेत. केंद्रशासित लक्षव्दिप प्रदेशात एकूण लोकसंख्येच्या ९३.८२ टक्के लोकसंख्या आदिवासींची आहे. मिझोरम मध्ये एकुण लोकसंख्येच्या ९३.५५ टक्के आहे. नागालॅंड मध्ये ९३.९९ टक्के आणि मेघालय राज्यात ८०.८५ टक्के आदिवासींची लोकसंख्या आहे. महाराष्ट्रात गोंड, कोरकु, वारली, कोलाम इ. आदिवासी जमाती आहेत.

**आदिवासी समाजाची संकल्पना :** नागरी व आधुनिक समाजापासून दुर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मुळचे रहिवासी म्हणजे आदिवासी असे सामान्यत: म्हणता येईल. सर्वसाधारणपणे जंगलात दऱ्या–खोऱ्यात व सुसंस्कृत समाजापासून तुटक असलेल्या दुर्गम भागात ते लहान लहान वस्ती करुन राहतात. एका विशिष्ट आदिवासी गटास 'जमात' म्हणून संबोधले जाते. भारतीय संविधानात आदिवासींना 'अनुसूचित जमाती' असे म्हणतात. आदिम, गिरीजन, वनवासी, मुळ निवासी धरतीची लेकरे, जंगलाचे राजे अशा विविध संज्ञानी आदिवासींना ओळखले जाते. भारतीय संविधानातील कलम ३४२ (१) नुसार, "ज्यांचा समावेश अनुसूचित जमातींच्या यादीत केला आहे त्यांना अनुसूचित जमाती असे म्हणतात." अनुसूचित जमातीमध्ये सर्वसाधारणपणे डोंगराळ प्रदेशात आणि जंगलात वास्तव्य करणाऱ्या आणि जे आधुनिक संस्कृती तसेच जीवन पध्दती पासून अलिप्त आहेत अशा लोकांचा समावेश करण्यात आला आहे. म्हणूनच आदिवासी म्हणजे अनुसूचित जमाती असे समीकरण रुढ झाले आहे.

**आदिवासी समाजासमोरील प्रश्न किंवा समस्या :** भारतातील आदिवासी समाजा समोरील प्रश्न किंवा समस्या या साध्या आणि सरळ नाहीत. त्यांचे प्रश्न व्यापक आणि जटील आहेत. या समस्या आदिवासीच्या आचार, विचार, राहणीमान, प्रथा, परंपरा, सभ्यता या सारख्या अनेक बाबींशी संबधीत आहेत. एकाच भौगोलिक प्रदेशात राहणाऱ्या आदिवासी जमातींच्या समस्यामध्ये भिन्नता दिसून येते. आदिवासी समाजातील प्रश्नांचे किंवा समस्यांचे स्वरुप हे भिन्न असले तरी काही समस्या सर्वच आदिवासी समाजात सामान्य आहेत. आदिवासी समाजात आर्थिक, सामाजिक, आरोग्य विषयक शैक्षणिक, धार्मिक, राजकीय आणि दळवळण विषयक काही प्रमुख समस्या आढळून येतात.

**अ) आर्थिक समस्या :** भारतातील कोणत्याही राज्यातील आदिवासी समाजाची आर्थिक समस्या ही एक प्रमुख समस्या आहे. आजही आदिवासी लोक पारंपारीक व्यवसाय करतात. या पारंपारीक व्यवसायातून त्यांना पुरेसे उत्पन्न मिळत नाही. ते आपल्या मुलभूत गरजा ही पूर्ण करु शकत नाही. त्यामुळेच आदिवासी गरीबीत आणि दारिद्रयात जगत आहेत. त्यांच्या आर्थिक समस्या खालील प्रमाणे :

१. **स्थांनातरीत शेतीची समस्या :** आदिवासी लोक एकाच ठिकाणी शेती करीत नाहीत. एकाच ठिकाणी दोन ते तीन वर्षे शेती केल्यानंतर जमिनिची सुपिकता कमी होवून उत्पन्न कमी होते. असा त्यांचा विश्वास आहे. म्हणून ते शेतीचे स्थान सतत बदलवित असतात. ते जंगलातील झाडे, झुडपे तोडून व गवत पसरवून ते पेटवून देतात. ती राख सर्वत्र शेतात पसरवून देतात. पाऊस पडल्यानंतर त्या जागी पेरणी करतात. स्थलांतरीत शेतीमुळे ते आपल्या शेतीचा विकास करु शकले नाही. परिणामी उत्पन्नात घट होवून अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

२. **कृषी समस्या :** आदिवासी लोकांची शेती करण्याची पध्दती ही परंपरागत आहे. ओलिताची सोय, नविन व संकरीत बियाणे, आधुनिक उपकरणे, रासायनिक खते या सारख्या गोष्टींचा अभाव त्यांच्या शेतीत असल्यामुळे त्यांना शेतीतून अधिक उत्पन्न मिळत नाही. निसर्गावर अवलंबून असलेली शेती केल्यामुळे अनेक प्रश्नांना आदिवासींना सामोरे जावे लागत आहे.

३.**जमिन आणि जंगलासंबंधी समस्या:** पूर्वी जमिनीवर आदिवासींचा अधिकार होता. ते आपल्या इच्छेनुसार पाहिजे तेथे शेती करु शकत होते. परंतु आधुनिक काळात शासनाने अनेक नविन नविन कायदे जंगले आणि जमिनी संबंधी केले आहेत. त्यामुळे आता ते स्थांनातरीत शेती करु शकत नाही. याशिवाय जंगलातील नैसर्गिक वस्तुंचा उपभोग ही आदिवासी घेवू शकत नाही. जंगलातील पशुंची शिकार करणे, मध, लाख, डिंक गोळा करणे, दारु गाळणे या सारख्या जंगतातील वस्तु गोळा करण्यावर या जंगल विषयक कायद्यामुळे अनेक बंधने आहेत.

१. **वस्तुविनियम आणि कर्जबाजारीपणा :** आदिवासी समाजात पूर्वी वस्तुविनिमयाची पध्दती होती. परंतु आधुनिक समाजातील मुद्रा प्रधान अर्थव्यवस्थेचा परिणाम आदिवासी समाजावर झाला. आधुनिक, सभ्य समाजापासून अलग असणाऱ्या आदिवासी समाजाच्या अज्ञानाचा फायदा घेवून व्यापारी, सावकार, मालक, ठेकेदार त्यांचे आर्थिक शोषण करीत आहेत. सावकार थोडी कर्जाउ रक्कम देवून त्यावर भरमसाठ व्याज लावून त्यांना कर्जबाजारी बनवून त्यांचे सतत शोषण करीत आहेत.

२. **औद्योगिक श्रमिक आदिवासींचे प्रश्न :** औद्योगिक क्षेत्राजवळ राहणाऱ्या आदिवासींना अल्प मोबला देवून त्यांच्याकडून अत्यंत कष्टाचे व मेहनतीची कामे करुन घेतली जातात. कारखान्यात आणि चहाच्या मळयात काम करणाऱ्या आदिवासी श्रमिकांची अवस्था अतिशय दयनिय आहे. आदिवासी मजुर ज्या परीसरात राहतात त्या ठिकाणी कोणत्याही सोयी, सवलती पुरविल्या जात नाहीत. आदिवासी कामगारांना कायद्याचे संरक्षण मिळत नाही. कारण ते कारखान्यात ठेकेदारामार्फत काम करतात.

३. **वेठबिगारीची पध्दत :** कायद्याने वेठबिगारीची पध्दत बंद असली तरी व्यापारी, ठेकेदार आणि अधिकारी आदिवासींकडून आपली सर्व कामे जबरदस्तीने करुन घेतात. त्यांना कामाचा अत्यंत कमी मोबदला देतात. सावकार आणि जमिनदारांच्या शेतीत अनेक आदिवासी लोक आयुष्यभर मेहनत करतात त्यांना रात्रंदिवस गुलामांप्रमाणे वागविले जाते. त्यांना कामाचा अत्यल्प मोबदला दिला जातो. अप्रत्यक्षपणे आदिवासी लोक हे सावकार आणि जमिनदारांचे वेठबिगार आहे.

**ब) सामाजिक समस्या :** आधुनिक काळात आदिवासी समाजाचा सभ्य समाजाशी संपर्क वाढल्यामुळे त्यांच्या सामाजिक संरचना, संघटना

आणि संपूर्ण सामाजिक व्यवस्थेवर सभ्य समाजाचा प्रभाव पडला आहे. त्यामधून आदिवासींच्या काही सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत.

**बाल विवाहाची समस्या:** परंपरागत आदिवासी समाजात बालविवाहाची पध्दत नव्हती परंतु हिंदू समाजाच्या संपर्कात आल्यामुळे त्यांच्या समाजात ही बाल विवाहाची प्रथा सुरु झाली. बाल विवाहाच्या समस्येमुळे आदिवासी समाजात घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहे व अल्पवयीन मातृत्वाची समस्या देखिल निर्माण झाली आहे.

**कन्यामुल्याची (हुंडयाची) समस्या :** आदिवासी समाजात कन्यामुल्याची प्रथा रुढ आहे. कन्यामुल्य हे वस्तु किंवा प्रतिकात्मक रूपाने घेतले जात होते. परंतु सभ्य समाजाशी आदिवासी समाजाचा संपर्क वाढल्यामुळे कन्यामुल्य रोख पैशाच्या रूपात घेण्याची प्रथा सुरु झाली. आदिवासी लोकांजवळ पैशाचा अभाव आहे. त्यामुळे आदिवासी समाजात कन्यामुल्याची समस्या निर्माण झाली आहे.

**वेश्यावृत्ती आणि गुप्त रोगाची समस्या :** आदिवासी लोक भोळे आणि साधे आहेत. आदिवासींच्या गरीबीचा आणि अज्ञानाचा फायदा घेवून सावकार, व्यापारी, विकेते आणि अधिकारी त्यांच्या स्त्रीयांशी अनैतिक संबंध ठेवतात. काही स्त्रीयांना वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त केले जाते. वेश्याव्यवसायामुळे आदिवासी स्त्रीयांना सिफलिस, गनोरिया, एडस् या सारख्या गुप्त रोगांची लागण होत आहे.

**युवागृहाचा ऱ्हास :** आदिवासी समाजात युवागृहाचे विशेष महत्त्व आहे. युवागृह ही त्यांची सामाजिक आणि सांस्कृतिक संस्था आहे. युवागृहाचे शैक्षणिक आणि संस्कृती संक्रमनाच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. परंतु सद्यस्थितीत औद्योगिकरण, शहरीकरण, शिक्षणाचा प्रसार यासारख्या अनेक घटकांच्या प्रभावामुळे युवागृह संस्थेचा ऱ्हास होत आहे.

**मद्यपानाची समस्या :** पूर्वीच्या काळी आदिवासी लोक मोहाच्या फुलापासून तयार केलेली दारु किंवा ताडी पित असत. अशा प्रकारची दारु ही आदिवासींच्या आरोग्याच्या दृष्टीने लाभदायक होती. पुरुषांप्रमाणेच स्त्रीयां देखिल दारु पित असत. परंतु जंगल विषयक धोरणामुळे जंगलातील वस्तु पासून दारु काढता येत नाही. त्यावर बंदी आहे. म्हणून आदिवासी लोक आरोग्याला हानिकारक असलेली देशी दारु पितात. अनेक आदिवासी लोक स्पिरिट देखिल पितात.

**क) सांस्कृतिक समस्या :** प्रत्येक आदिवासी जमातीची एक सर्वसामान्य अशी संस्कृती होती. परंतु त्यांचा हिंदू आणि खिश्चन लोकांच्या संस्कृतीशी संबंध आल्यामुळे त्यांच्या सांस्कृतिक समस्या निर्माण झाल्या आहेत.

**सांस्कृतिक भिन्नतेची समस्या :** आधुनिक संस्कृतीचा प्रभाव आदिवासी जमातींच्या संस्कृतीवर पडला आहे. काही आदिवासींनी सभ्य समाजातील संस्कृतीची तत्वे आत्मसात केली आहेत. त्या लोकांना आपली संस्कृती ही मागासलेली आणि अयोग्य वाटते. अनेक आदिवासींनी आपली पारंपारीक संस्कृती सोडली आहे.

**भाषेची समस्या :** प्रत्येक आदिवासी समाजाची स्वतंत्र बोलीभाषा आहे. या बोलीभाषेव्दारेच त्यांचे सर्व व्यवहार चालतात. प्रत्येक आदिवासी जमातीची लोकगीते, लोककथा आहेत. आधुनिक काळात सभ्य समाजाची भाषा बोलणे त्यांना प्रतिष्ठेचे लक्षण वाटू लागले. त्यामुळे ते हळूहळू आपली बोलीभाषा विसरु लागले आहेत.

**ललित कलांचा ऱ्हास :** अन्य प्रगत समाजाच्या सांस्कृतिक संपर्काचा परिणाम आदिवासींच्या ललित कलांवर झाला आहे. आदिवासी समाजात नृत्यकला, गायनकला, मुर्तीकला, चित्रकला इ. अनेक कला आढळतात. घराच्या भिंती, युवागृहाच्या भिंती, प्रवेशव्दारावर कलाकुसर केली जात होती. सभ्य समाजाशी संपर्क आल्यामुळे या ललित कलांचा ऱ्हास होतांना दिसून येत आहे.

**ड) आरोग्यविषयक समस्या :** आदिवासी समाजाच्या आरोग्यविषयक काही समस्या खालील प्रमाणे :

**खान पानाच्या समस्या :** आदिवासी लोक हे गरीब असल्यामुळे ते संतुलित आहार घेवू शकत नाही. त्यांच्या आहारात प्रोटीन व कॅलशियम चे प्रमाण फारच कमी असते. अनेक आदिवासी अर्धपोटीच असतात. शरीराचे पोषण व्यवस्थित न झाल्यामुळे आदिवासींना अनेक शारीरीक व्याधिंना सामोरे जावे लागत आहे. अनेक रोगांना बळी पडावे लागत आहे.

**वस्त्र :** आदिवासींची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीबीची व दारिद्रयाची असल्यामुळे त्यांच्या जवळ जास्त कपडे नसतात. एकच ड्रेस किंवा कपडा अंगावर सतत असल्यामुळे कपडे स्वच्छ करण्याचा प्रश्न निर्माण होतो. तेच तेच कपडे सतत वापरल्यामुळे चर्मरोग होतो. पावसाळयात कपडे ओले झाल्या नंतर ते अंगावरच असतात त्यामुळे ताप, सर्दी, निमोनिया होण्याचे प्रमाण अदिवासी समाजात जास्त आहे

**पिण्याच्या पाण्याचा प्रश्न :** आदिवासी भागात पिण्याच्या स्वच्छ पाण्याची सुविधा नसते. त्यामुळे हे लोक नदी, नाले, ओहळ, विहिरी, तलाव यामधील पाणी पिण्यासाठी वापरतात. हे पाणी बऱ्याच वेळा दुषित व गढूळ असते. आरोग्यास हानीकारक असते. या पाण्यामधून गॅस्ट्रो, मलेरीया, यासारखे आजार आदिवासींना सतत होत असतात

**आरोग्य सुविधांचा अभाव :** आदिवासी भागात आरोग्य सुविधांचा अभाव आढळतो. आदिवासी राहत असलेल्या दुर्गम भागापर्यंत वैद्यकिय सुविधा पोहचविल्या जात नाहीत. तज्ञ डॉक्टर, नर्सेस आणि आरोग्य अधिकारी व कर्मचारी या दुर्गम भागात जाण्याचे टाळतात. त्यामुळे शासकीय व खाजगी आरोग्य सुविधांचा लाभ आदिवासींना पुरेसा लाभ मिळत नाही.

**कुपोषणाची समस्या :** आदिवासी समाजात कुपोषणाची फार मोठी समस्या निर्माण झालेली दिसून येते. दारिद्र्य व गरीबीमुळे आदिवासी लोकांना पुरेसा सकस आहार मिळत नाही. आदिवासी माता आणि मुलांना आहारातून जिवनसत्वे व खनिजे मिळत नाहीत. त्यामुळे कुपोषणाची समस्या आढळून येते. कुपोषणामुळे दरवर्षी शेकडो आदिवासी मुले मरतात. कुपोषणाची बिकट समस्या आदिवासी समाजात निर्माण झाली आहे.

**इ) शैक्षणिक समस्या :** आदिवासी समाजामध्ये निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. निरक्षरता आणि अज्ञानामुळे त्यांच्या अनेक प्रकारच्या अंधश्रध्दा, परंपरा आणि प्रथा निर्माण झाल्या आहेत. आधुनिक शिक्षण घेतलेले लोक आपल्या समाजापासून अलिप्त राहत आहेत. या आधुनिक शिक्षणाचा त्यांच्या समजा जिवनाशी कोणताही संबंध नाही. आधुनिक शिक्षण घेतलेली मुले आदिवासी संस्कृतीपासून दुर जात आहेत. शिक्षणाच्या अभावामुळे आदिवासी समाजात जशा समस्या निर्माण झाल्या आहेत, तशाच प्रकारे आधुनिक शिक्षण घेतल्यामुळे देखिल काही समस्या निर्माण झाल्या आहेत.

**फ) धार्मिक समस्या :** आदिवासी समाजावर धर्म आणि जादूचा खुप प्रभाव आहे. आदिवासी धर्म हा त्यांच्या दैनंदिन जीवनातील घटनांशी संबंधित होता. खिश्चन मिशनऱ्यांच्या प्रभावामुळे अनेक आदिवासींनी खिश्चन धर्म स्विकारला आहे. काही आदिवासी हिंदू धर्मीयांच्या देवदेवतांची पूजा करु लागले आहेत. हिंदू आदिवासी आणि मुळ आदिवासी यांच्यात धार्मिक आणि सांस्कृतिक भिन्नता निर्माण झाली आहे. अशाप्रकारे आदिवासी समाजातील परंपरागत धार्मिक विश्वास नष्ट होत आहे. त्यामुळे आदिवासी समाजाचे धार्मिक प्रश्न निर्माण झालेले आढळून येतात.

**ग) राजकीय समस्या :** पूर्वी आदिवासी समाजात राजकीय संघटन होते. त्यांच्या जमातीत एक जमात प्रमुख व त्याचे सल्लागार असत.

त्यांच्या सहकार्याने जमात प्रमुख आपल्या जमातींच्या सदस्यावर नियंत्रण ठेवत असे. त्यांचे वाद, प्रश्न सोडवित असत. आधुनिक काळात सरकारी अधिकारी, पोलीस, सरपंच, पोलिस पाटील या सारख्या लोकांच्या हातात सत्ता गेली आहे. समाजावर नियंत्रण ठेवण्याचे काम या सरकारी कर्मचाऱ्याव्दारे केले जाते. या अधिकाऱ्यांना आदिवासी समाजाच्या रुढी, परंपराचे ज्ञान नसल्यामुळे त्यांच्या समस्या सोडविल्या जात नाही. आधुनिक राजकीय ज्ञानाचा आदिवासी समाजात अभाव आहे. निवडणुकांच्या वेळी पैसा किंवा वस्तु देवून राजकीय नेते त्यांची मते विकत घेतात. राजकीय पक्ष त्यांच्यावर दबाव आणून आपल्या विशिष्ट उमेदवाराला मतदान करण्यास भाग पाडतात. या सारख्या अनेक राजकीय समस्या आदिवासी समाजात दिसून येतात.

**ह) दळणवळणाच्या साधनाचा अभाव :** आदिवासी समाज हा डोंगर, दऱ्यात, अति दुर्गम भागात राहत असल्यामुळे तेथे जाण्यासाठी चांगले, पक्के रस्ते नाहीत. त्यामुळे अनेक सुविधा त्यांच्या पर्यंत पोहचविणे अशक्य होते. शिवाय अनेक प्रसंगी त्यांच्याशी संपर्क साधणे, त्यांच्या पर्यंत जिवनावश्यक सुविधा पोहचविणे कठीण बनले आहे. आजारपण, बाळंतपण या सारख्या प्रसंगी व्यक्तींना शहरात आणण्यास अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे दळणवळणाची समस्या देखिल सर्वच आदिवासी पाडे व वस्त्यांना भेडसावत आहे.

अशा प्रकारे आदिवासींच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्यविषयक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय आणि दळणवळण या सारख्या अनेक समस्या व प्रश्नांनी आदिवासींना ग्रासले आहे. या समस्यांच्या निर्मूलनाशिवाय आदिवासींच्या विकास करणे शक्य नाही.

**आदिवासी समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी उपाय :** आदिवासी समाज अनेक समस्यांनी ग्रासला गेला आहे. त्यामुळे या समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी आणि त्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने केंद्र आणि राज्यशासनाने विविध उपाययोजना केल्या आहेत. या उपाययोजना आणि आदिवासी कल्याण कार्यक्रम हा भारतीय संविधानातील घटनात्मक तरतुदीवर आधारीत आहे. भारतातील आदिवासींच्या समस्या किंवा प्रश्न सोडविण्यासाठी खालील उपाययोजना केलेल्या आहेत.

**१) शासकीय नोकऱ्यात आरक्षण :** भारतीय संविधानातील ३३५ परिच्छेदानुसार 'केंद्रीय लोकसेवा आयोग' आणि 'राज्य लोकसेवा आयोग' तसेच निवड मंडळ मार्फत भरल्या जाणाऱ्या एकूण जागापैकी ७.५ टक्के जागा आदिवासी समाजासाठी आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. शासकीय नोकऱ्या प्रमाणेच शासकीय अनुदानावर चालणाऱ्या संस्थांच्या नोकऱ्यातसुध्दा आरक्षण देण्यात आले आहे. आदिवासींची भरती करतांना त्यांच्याकरीता वयाची अट शिथिल करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे किमान गुणवत्ता, किमान अनुभव, पदोन्नती इ. बाबत आदिवासींना विशेष सवलती देण्यात आल्या आहेत.

**२) शैक्षणिक सवलती :** आदिवासी लोक हे निरक्षर आहेत. शिक्षणाच्या अभावामुळे हे लोक मागासलेले व गरीब आहेत. त्यामुळे त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या आहेत. आदिवासींच्या मुला मुलींना मॅट्रीक नंतर च्या शिक्षणासाठी भारत सरकारची शिष्यवृत्ती दिली जाते. त्यांच्यासाठी प्रत्येक जिल्हयात, जिल्हयाच्या ठिकाणी वस्तीगृहाची व्यवस्था करण्यात आली आहे. या शासकीय वस्तीगृहात हुशार आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. त्यांच्या जेवनाचा व पुस्तकांचा खर्च शासनामार्फत केला जातो. केंद्रिय लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या अखिल भारतीय स्तरावरील स्पर्धा परिक्षेकरीता आदिवासी विद्यार्थ्यांची तयारी करून घेण्यासाठी अलाहाबाद, जयपुर, मद्रास, पटियाला, शिलॉग आणि दिल्ली येथे मार्गदर्शन केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.

**३) शासकीय आरक्षण :** लोकसभा आणि विधानसभेत आदिवासींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात म्हणजे ७.५ टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. या आरक्षित जागांमुळे आदिवासींना लोकसभा आणि विधानसभेत प्रतिनिधित्व मिळाले आहे. जिल्हा परिषदा, महानगरपालिका, पंचायत समिती, ग्रामपंचायत इ. मध्ये देखिल आरक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

**४) आर्थिक विकास :** आदिवासींचा आर्थिक विकास करण्यासाठी शेती, कुटीरउद्योग, सरकारी संस्था, आर्थिक विकास महामंडळे इ. कडे शासनाने विशेष लक्ष दिले आहे. आदिवासींचा प्रमुख व्यवसाय शेती असल्यामुळे आदिवासींच्या शेतजमिनीचे हस्तांतरण टाळण्यासाठी शासनाने कायदा केला आहे. या कायद्यानुसार आदिवासींच्या मालकीच्या जमिनिची विक्री, देणगी, गहाण यासारखे व्यवहार बिगर आदिवासींना करता येत नाहीत. आदिवासींच्या शेती करण्याच्या पध्दतीमध्ये सुधारणा व्हाव्या म्हणून केंद्र शासनातर्फे अनेक प्रायोगिक योजना आखण्यात आल्या आहेत.

**५) वैद्यकिय मदत आणि आरोग्य संरक्षण :** आदिवासी लोकांच्या आरोग्यविषयक अनेक समस्या आहेत. अपुरा आणि निकृष्ट आहार, रोगावर उपाय करण्याविषयी असलेली उदासिनता या गोष्टी लक्षात घेवून शासनातर्फे आदिवासी कल्याण कार्यक्रमाअंतर्गत विविध प्रकारची आरोग्य विषयक मदत दिली जाते. आदिवासींच्या पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्याचे प्रयत्न करण्यात आले. आदिवासी विभागात दवाखाण्याची व्यवस्था करण्यात आली. दुर्गम भागात आदिवासी समाजाकरीता फिरते दवाखाणे सुरू करण्यात आले.

**६) पंचवार्षिक योजना :** शासनाने प्रत्येक पंचवार्षिक योजनेत आदिवासींच्या विकासासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. आदिवासींच्या कल्याणासाठी विशिष्ट निधीची तरतुद प्रत्येक पंचवार्षिक योजनेत केली जाते. व निधी केवळ आदिवासींच्या कल्याणासाठीच खर्च केला जातो. ग्रामीण भागातील आदिवासींना विशेष मदत केली जाते. त्यामध्ये विहिरी खोदणे व बांधणे, बियाणे, खते इ.साठी त्यांना अर्थसहाय दिले जाते.

**७) प्रशासकिय व्यवस्था :** आदिवासी क्षेत्रात विकास कार्याला विशेष गती मिळावी, या उद्देशाने आदिवासी क्षेत्रात भारतीय संविधानात केलेल्या तरतुदी नुसार प्रशासकीय व्यवस्था करण्यात आली आहे. संविधानाच्या ५ व्या (पाचव्या) अनुसूचित आदिवासी क्षेत्र असलेल्या राज्यात प्रादेशिक सल्लागार परिषदेची स्थापणा करण्याची तरतुद आहे.

आदिवासीचा विकास व्हावा म्हणून ऑक्टोबर १९९९ मध्ये केंद्रशासनाने आदिवासी मंत्रालयाची स्थापणा केली. एप्रिल २००१ मध्ये भारत सरकारने राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्तीय विकास आयोगाची स्थापणा केली. तर २००२–२००३ पासून आदिवासी महिला सक्षमिकरणाची योजना केंद्र सरकारने सुरू केली.


**संदर्भ ग्रंथ**

१. *भारतातील सामाजिक समस्या – डॉ. प्रदिप आगलावे, डॉ.सरोज आगलावे.*
२. *सामाजिक मानवशास्त्र – डॉ. बोबडे, लोटे.*
३. *भारतीय समजा आणि सामाजिक समस्या – डॉ.भा.कि.खडसे.*
४. *भारतातील सामाजिक समस्या – डॉ.भा.कि.खडसे.*